


Print Title: Prabhat

Date: 24 Oct 2010

# मुंबईत लाईफ स्टाईल एक्सपो

पुणे, दि. २३ - हाँगकाँग व्यापार विकास परिषद व गुआँगडाँग क्षेत्रातील व्यापार विकसक संस्थांच्या वतीने लाईफस्टाईल एक्स्पो इन मुंबईचे आयोजन २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान करत आहे.

एलईएम २०१० मध्ये भारतीय कंपन्यांना हाँगकाँग आणि गुआँगडाँग प्रोव्हिन्स (चीन) मधील दर्जेदार जीवनशैली उत्पादनाची विस्तृत रेंज उपलब्ध आहे. एका अनोख्या अशा ट्रेड शोचे आयोजन भारतात पहिल्यांदाच करण्यात येत असून गुआँगडाँग येथील उत्पादक यांच्यादरम्यान नवीन व्यवसाय भागीदारी स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

यावेळी बोलताना एचकेटीडीच्या साऊथ ईस्ट व इंडियाच्या प्रादेशिक संचालक लॅरिट्टा वॅन म्हणाल्या, हाँगकाँग हे आशियातील एक प्रख्यात डिझाईन केंद्र आहे आणि गुआँगडाँग हे आपल्या उत्पादक कौशल्यासाठी सर्वश्रुत आहे. दोन्हीचा मिळून भारतीय ग्राहकांसाठी एक अतुलनीय असा अनुभव प्राप्त होणार आहे. यामुळे भारतातील उद्योजकांना हाँगकाँगमधीलउद्योजकाबरोबरच निर्यातीसंदर्भात चर्चा करता येईल.